# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## (वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

संकेतस्थळ : www.unigug.ac.in    ई.मेल :faogug@gmail.com, fao@unigug.ac.in

जावक क्रमांक/गो.वि./वि.ले.वि./१६५९/२०२२    दिनांक :२९/०१/२०२२

**गोंडवाना विद्यापीठ प्रवास व दैनिकभत्ता नियमावली -२०१७**
**सुधारणा क्र. २**

## परिपत्रक

**वाचा** :- १) वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. विलेवि/१७अ/२०१७, दि. ०२/०१/२०१७ (मुळ नियम)
२) वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. विलेवि/२३५२/२०१८, दि. ०९/०३/२०१८ (सुधारणा क्र. १)
३) मा. व्यवस्थापन परिषद सभा दिनांक ११/११/२०२१ चे मंजुर कार्यवृत्तातील बाब क्र. १०७ व १०८ अन्वये पारीत ठराव.

---------****#****---------

संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये **गोंडवाना विद्यापीठ प्रवास व दैनिकभत्ता नियमावली -२०१७** विहीत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये संदर्भीय परिपत्रक क्र. २ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन परिषद सभा दिनांक ११/११/२०२१ चे मंजुर कार्यवृत्तातील बाब क्र. १०७ व १०८ अन्वये पारीत ठरावान्वये प्राप्त मंजुरीनुसार **गोंडवाना विद्यापीठ प्रवास व दैनिकभत्ता नियमावली -२०१७** मध्ये या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत. या सुधारणा दि. ०१/०४/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहेत.

**सुधारणा क्र. १)** मुळ नियमावलीतील नियम क्र. (२) - स्थानिक प्रवासभत्ता या नियमाखाली नव्याने खालील पोटनियम क्र. २.३ समाविष्ट करण्यात येत आहे.

२.३ विद्यापीठाच्या कामानिमित्त गडचिरोली शहरात जाणेसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी विद्यापीठ वाहनाव्यतिरीक्त इतर साधनानी प्रवास करणाऱ्या गोंडवाना विद्यापीठातील सर्व विभागातील संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना रू. १००/- प्रती प्रवासफेरी (एक प्रवासफेरी = जाणे + येणे साठी केलेला प्रवास) स्थानिक भत्ता देय होईल. यासाठी संबंधीतांनी त्यांचे विभागप्रमुखांच्या मान्यतेने हलचल नोंदवहीत नोंद करून प्रवास करावा व याप्रित्यर्थची देयके TADA Form नमुन्यात शोधनासाठी सादर करताना हलचल नोंदवहीच्या संबंधीत पृष्ठाची प्रमाणीत प्रत संलग्नित करावी.

**सुधारणा क्र. २)** मुळ नियमावलीतील नियम क्र. (७) - अंतर्गत कोष्टकातील इंधनाचे अनुज्ञेय प्रती कि.मी. दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | खाजगी पेट्रोल वाहन | | खाजगी डिझेल वाहन | |
|---|---|---|---|---|---|
| | | जुने दर | सुधारीत दर | जुने दर | सुधारीत दर |
| १ | विद्यापीठ अधिष्ठाता/व्यवस्थापन परिषद सदस्य/विषय निहाय अध्यक्ष | रू. ९/- प्रति कि.मी. | रू. १२/- प्रति कि.मी. | रू. ७/- प्रति कि.मी. | रू. ९/- प्रति कि.मी. |
| २ | विद्यापीठ क्षेत्रा बाहेरून विद्यापीठ कामाकरीता येणाऱ्या विशेष आमंत्रीत मान्यवरांच्या प्रवासभत्ता देयकाचे शोधन | रू. ९/- प्रति कि मी. | रू. १२/- प्रति कि.मी. | रू.७/- प्रति कि.मी. | रू. ९/- प्रति कि.मी. |
| ३ | इतर सदस्य/परीक्षा मंडळाचे सदस्य | रू. ७/- प्रति कि.मी. | रू. ९/- प्रति कि.मी. | रू. ५/- प्रति कि.मी. | रू. ७/- प्रति कि.मी. |
| ४ | दोन किंवा त्यापेक्षा जास्त सदस्यांनी एकाच ठिकाणावरून एकत्रित प्रवास येणे/जाणे केल्यास | रू. ९/- प्रति कि.मी. | रू. १२/- प्रति कि.मी. | रू. ७/- प्रति कि.मी. | रू. ९/- प्रति कि.मी. |

उर्वरित सर्व नियम पुर्वीप्रमाणेच लागु राहतील.

(डॉ. सुरेश रेवतकर)
वित्त व लेखा अधिकारी(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ. गडचिरोली

**प्रतिलिपी** :-
१) मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. सर्व संवैधानिक अधिकारी/विभाग प्रमुख/संचालक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. सर्व प्राधिकरणांचे / मंडळांचे / समित्यांचे सदस्य, परिक्षक, मॉडरेटर, विविध मंडळे तसेच विद्यापीठाशी संबंधीत कार्याकरीता विद्यापीठात उपस्थित राहणारे मान्यवर इ.
६) मा. प्राचार्य / प्राध्यापक, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
७) विद्यापीठाचे सर्व अधिकारी व कर्मचारी